Literacy for a Billion

Movie: Gho Mala Asla Hava
Year: 2009

Song: Ek Dis Yeyil Tasa
Lyricist:

एक दिस येई तसा
दुजा दिस येई
येई तसा जाई दिस
येई तसा जाई
एक दिस येई तसा
दुजा दिस येई
येई तसा जाई गो येई तसा जाई
माझ्या म्हायेरचा सूर्य उशीरानं उगवायचा
दुपारच्या वक्ताला निजू निजू लोळायचा
सासरच्या दिवसाला छत्तीसाच्या वर तास
किती उरक पाडावा कामाधामाची ही रास
एक दिस येई तसा दुजा दिस येई
येई तसा जाई गो येई तसा जाई

माये तुझी शिवीगाळी आठवते तिन्ही काळी
माये तुझी शिवीगाळी आठवते तिन्ही काळी
कशी फणसाच्या आत ग्वाड गराची आठळी

कसं बाई सोडलसं तुझ्या मायेचं तू घर
तुझ्या सासरी नांदून मला दिलस म्हायेर
कष्टाला मी न्हाई भित पाळीन मी जन रीत
कष्टाला मी न्हाई भित पाळीन मी जन रीत
तरी जीव अडकला हिंदोळ्यांच्या पंचमीत
आय घोवाच्या रूपानं सखा भेटला जीवाचा
सासू तुझ्या गं सारखी मागे संसार सुखाचा
असं ललाटी लिहीलं एखादीच्या असतं भाळी
असं ललाटी लिहीलं एखादीच्या असतं भाळी
नाहीतर तोच दिस दिसतोच तो कपाळी
एक दिस येई तसा दुजा दिस येई
येई तसा जाई दिस येई तसा जाई
एक दिस येई तसा दुजा दिस येई
येई तसा जाई गो येई तसा जाई
येई तसा जाई गो येई तसा जाई
येई तसा जाई गो येई तसा जाई
येई तसा जाई गो येई तसा जाई

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.